*मौलिक विचार माला - ३२*

श्रीगुलाबरावमहाराजांचा

# श्रीबाबाजीमहाराज पंडित



*श्रीज्ञानेश्वर मधुराद्वैत सांप्रदायिक मंडळ*
*दहीसाथ अमरावती*

रु.५

**सहयोग : दिलीप रामदासानी*







*श्रीमहाराजांच्या वाङ्मयीन मूर्तीचे शिल्पकार*

## श्रीबाबाजीमहाराज पंडित

वयाच्या १९ व्या वर्षी चंद्रपूरचे नारायण पैकाजी पंडित प्रज्ञाचक्षु श्रीगुलाबराव महाराजांकडे आले.१९०५ मध्ये त्यांनी आई-वडिल घरदार शिक्षण वगैरे सर्व सोडून देऊन सद्गुरुसेवेस आरंभ केला.महाराजांचे कपडे धुणे, आंघोळीस पाणी देणे, स्वतः स्वयंपाक करून महाराजांना जेऊं घालणे वगैरे लहानमोठी सर्व प्रकारची कामे जीव ओतून केलीत. जणुं ज्ञानेश्वरीतील सद्गुरुसेवा मूर्तिमंत साकार झाली.

हरिभाऊ केवले, गंगाधर मुळे वगैरे ग्रंथलेखनिकांत ते प्रमुख होते.त्यांनी महाराजांची अगदि निरपेक्ष सेवा केली पण त्यांनी महाराजांना केव्हाच काहीहि मागितलं नाही.त्यांचे ते निर्व्याज आणि उत्कट प्रेम पाहून महाराजांनी उद्गार काढले - ''मी पंडिताला वश झालो आहे''

गुरुभक्तीनं ओथंबलेल्या अन्तकरणाला आणखी काय हवं असतं? शेवटच्या वेळी तर महाराजांनी आपण होऊन आशीर्वाद दिला-

''अरे पंडित, आजवर मी तुला काही दिलं नाही.
माझे ग्रंथ वाच. तुला समजतील! ''

या अमोघ शब्दांनी 'ये हृदयीचं ते हृदयी सामावलं.' पंडितांचं सारं जीवनच उजळून गेलं. त्या सोज्वळ प्रकाशात महाराजांच्या ग्रंथांची सर्व हस्तलिखिते सूक्तिरत्नावलीच्या रूपाने प्रकाशित झालीत अन् पंडितांच्या अखंड परिश्रमांनी महाराजांची वाङ्मयीन मूर्ती साकारली.दृष्ट लागावं असं अक्षरशिल्प मुद्रांकित होऊन सर्वांना उपलब्ध झालं!






# मधुराद्वैत गंगेवरील प्रयागतीर्थ :

# श्रीबाबाजीमहाराज पंडित

मधुराद्वैत संप्रदायाचे द्वितीय आचार्य नारायणराव उर्फ श्रीबाबाजी महाराज पंडित यांची जीवनगाथा म्हणजे आदर्श जीवनपट होय. श्रीबाबाजी महाराजांचा जन्म चंद्रपुर येथे शके १८०७ मध्ये झाला. घराची सांपत्तिक स्थिती बोताबाताचीच. पंडित हे कऱ्हाडे ऋग्वेदी ब्राह्मण, पूर्वज झांशीच्या दरबाराचे सरदार. पण १८५७ च्या स्वातंत्र्यलढ्यानंतर सर्व घरच विखुरलेले. आजोबा चांद्याला चांगल्या नोकरीत होते, पण त्यांचे अकालीच निधन झाल्यामुळे वडील लहानपणीच पोरके झाले. जवळच्या पापुवार या तेलगु कुटुंबाने त्यांचा मुलाप्रमाणे सांभाळ करून त्यांचे लग्न करून दिले व तहसिलदाराच्या कार्यालयात त्यांना नोकरीवरही लावुन दिले. तहसिलदाराच्या कार्यालयातील कारकुनाला पगार तो काय मिळणार?







घरी मुलेबाळे मिळून एकंदर बारा पंधरा जण होते. त्या मानाने उत्पन्न अगदीच कमी. ओढाताणीचा सर्व संसार. त्यातही तीनचार मुले मोठी होऊन दगावली. कै. दत्तात्रय उर्फ आबाजी हे महाराजांचे वडील बंधू. दोघेही मोठ्या कष्टाने वर आले. मॅट्रिकची परीक्षा दोघेही उत्तीर्ण झाले. दोघाही भावांचे एकमेकांवर अत्यंत प्रेम होते व ते शेवटपर्यंत कायम टिकले. लहान भावाने नोकरी न करता शिकावे म्हणून त्यावेळी त्यांना मिळणाऱ्या अल्पशा वेतनातून ते पैसा पाठवीत. त्यांच्या वडिलांचे एक मावसभाऊ डॉ. कृष्णराव देवस्थळे म्हणून होते. ते त्यावेळी जबलपूरला व्हेटर्नरी डॉक्टर होते. महाविद्यालयीन शिक्षणाकरता हे त्यांच्याकडे राहू लागले. पण डॉक्टरांच्या बदलीमुळे यांनाही वेळोवेळी महाविद्यालये बदलावी लागली. नागपूरला शेवटी ते हिस्लॉप महाविद्यालयात दाखल झाले व इंटरचा त्यांचा अभ्यासक्रम सुरू झाला.

नागपूरला त्यांचे मेव्हणे कै. भाऊसाहेब खापरे हेही त्याचवेळी त्यांच्या बरोबर होते. दोघेही मित्र.

लहानपणापासूनच अध्यात्माची गोडी असल्यामुळे कीर्तनप्रवचनादी ऐकण्याकडे दोघांचाही ओढा होता. कोणत्याही सत्पुरुषाची कीर्ती कानावर येताच दर्शनाला जाण्याची दोघांनाही तीव्र इच्छा व्हायची. श्रीबाबाजी महाराजांच्या वडिलांची उपासना श्रीदत्तात्रेयाची असल्यामुळे श्रीगुरुचरित्राचे पारायण घरी व्हावयाचे. यांनीही श्रीगुरुचरित्राची अनेक पारायणे केली. अनेक अवलियांच्यांही भेटी घेतल्या. पण मनाला आवडेल व समाधान वाटेल असा गुरू त्यांना मिळाला नाही.

नागपुरला शिकायला आल्यावर श्री भाऊसाहेब खापरे यांच्या तोंडून त्यांना कळले की कोणीतरी बालांध संत आले असून ते ज्ञानेश्वरीवर प्रवचन करतात. त्यांच्या दर्शनाला जाण्याचा दोघांनीही निश्चय केला व श्रीमहाराजांचे दर्शन घेऊन आले. अंतःकरणात श्रीमहाराजांविषयी आदर व श्रद्धा निर्माण झाली. पत्नीकडे श्रीमहाराजांचे कात्यायनी व्रत वाठोड्याला सुरुवात होणार होते. ते एकदा पाहाण्यास जावे असे दोघांनीही ठरविले. कात्यायनी व्रताचा तो सर्व सोहळा पाहून त्यांच्या अंतःकरणात





श्रीमहाराजांविषयी असीम श्रद्धा निर्माण झाली; व अंतःकरणाची तळमळ शांत झाली व मनाला एकप्रकारचे समाधान लाभले. श्रीमहाराजांच्या सेवेतच सर्व आयुष्य घालविण्याचा त्यांनी निर्णय घेतला व शिक्षणाला रामराम ठोकला. महाराजांनी घरी परत जाण्याविषयी विचारताच त्यांना दुःखाचा एवढा आवेग आला की शेवटी महाराजांनी आपल्याजवळ राहण्याची अनुमती दिली. त्या दिवसापासून त्यांनी आई, बाप, भाऊ, पत्नी इत्यादि सर्व लौकिक नातलगांच्या बंधाचा त्याग केला व महाराजांना आपले सर्वस्व अर्पण केले.

घराच्या ओढाताणीच्या आर्थिक स्थितीमुळे वडिलांना मुलाने चार चौघाप्रमाणे पैसा मिळवून संसार करावा असे वाटणे साहजिकच होते. पण अंतःकरणाची स्थिती संसार करण्याची नसताना तो संसार व्हावा कसा? यांची माया 'अवघी देवावरी'. पत्नीला काही दिवस माहेरी तर काही दिवस सासरी असा काळ काढावा लागला. विपत्तींच्या आगीतून तावून सुलाखून निघाल्याशिवाय खऱ्या सोन्याची परीक्षा तरी कशी





व्हावी? घराकडील प्रेम व ओढा अजिबात नाहिसे होईपर्यंत तशीच कायम राहीली. श्रीमहारांचे शब्द वेदवाक्याप्रमाणे शिरोधार्य मानून त्यांनी श्रीमहाराजांची जवळ जवळ एक तप अविरत एकनिष्ठेने सेवा केली. शरीर व मन सर्वस्वी सद्गुरुच्या पायी कसे वहावे हे त्यांच्या सेवेवरूनच कळण्यासारखे आहे. दिवस नाही, रात्र नाही, देह व मन श्रीगुरूंच्या आज्ञापरतंत्र झालेले. त्यामुळे त्यांचे अस्तित्व केवळ नाममात्रच. मोक्षप्राप्तिकरता 'सेवा हाचि दारवंटा' श्रीमाऊलीने सांगितला आहे. त्याच दारवंट्याचा आश्रय त्यांनी केला.


श्रीमहाराजांच्या सहवासात अनेक ग्रंथ महाराजांना वाचून दाखवावे लागत. श्रीमहाराजांना कोणताही विषय अज्ञात नसल्यामुळे अनेक विषयांचे वाचन चालायचे. रात्ररात्र श्रीमहाराजांची प्रवचने व्हावयाची. तीही निरनिराळ्या विषयांवर. त्यांची सर्व प्रवचने हे भराभर लिहून घ्यावयाचे. श्रीमहाराजांच्या वाणीचा वेग प्रचंड. पण यांनीही





आपल्या लेखणीला तद्नुरूप करण्याचा प्रयत्न केला. तरी देखील स्वतःच लिहिलेले स्वतः वाचणे कठीण व्हावयाचे. म्हणून पुन्हा स्वच्छ अक्षरात सर्व प्रवचने लिहून काढायचे. मोठमोठ्या ग्रंथातील उत्तमोत्तम वेचे लिहून घ्यायाचे. अभावितपणे त्यांनाही अनेक कठीण विषयांचे ज्ञान होऊ लागले. प्रवचने लिहून घेण्यात - कै. हरिअण्णा केवले हेच त्यांचे एकमेव सोबती होते. आज श्रीमहाराजांचे अनेक ग्रंथ प्रकाशित होऊन लोकांना त्यांच्या वाङ्मयाचे जे दर्शन घडले व घडत आहे ते सर्व कै. हरिअण्णा व श्रीबाबाजी महाराज यांच्याच श्रमांचे फळ होय.

अलौकिक महात्म्यांचे चरित्र वाचताना गोड वाटते. पण त्या महात्म्यांच्या सान्निध्यात एक क्षण देखील काढणे कठीण तपस्यांच असते. याचा अनुभव अशा महात्म्यांच्या सहवासात आल्याशिवाय कळणे शक्य नाही. महात्म्यांच्या अलौकिक गुणांचे दर्शन होताच श्रद्धेने अंतःकरणात भरून येते. पण सामान्य लोकांप्रमाणे रागद्वेषादिकांचे त्यांनी दर्शन घडवताच







'अरे हेही आपल्याच सारखे' अशी वृत्ति अंतःकरणात एकदम उठते व आदराची जागा अनादर होऊ पाहतो. अशा वेळी श्रद्धेला जाणारा तडा कोणत्याही ज्ञानाने पुन्हा साधणे कठीण. श्रद्धावृत्तीची जोपासना ही एक सुळावरची पोळीच. अंतःकरण अत्यंत निर्मळ झाल्याशिवाय सद्गुरुला परमेश्वररूप पाहणे व तदनुसार व्यवहार करणे सामान्य माणसाला कठीणच आहे. अंतःकरणातील हा वृत्तींचा तोल न सांभाळता आल्यामुळेच अनेक लोक श्रीमहाराजांच्या सान्निध्यात येऊनही दुरावले. पंडितांनी श्रीमहाराजांसारख्या अलौकिक विभूतीच्या सहवासात राहून त्यांचे जे असीम प्रेम संपादन केले त्यामागे त्यांच्या अंतःकरणाची केवढी तयारी असेल हे कळून येईल.

'सर्वभावे पति ध्यानी मनी' पहाणाऱ्या पतिव्रता स्त्रीप्रमाणे सद्गुरुचरणी सर्व चित्तवृत्ती एकरूप करणाऱ्या शिष्यावर श्रीगुरु कसे प्रसन्न होणार नाहीत? आपल्यामागे श्रीकृष्णमूर्ति व श्रीमाऊलींच्या पादुका यांना सोडणार नसल्याची शपथ कोण घेण्यास तयार





आहे, याविषयी उपस्थित असलेल्या मंडळींना श्रीमहाराजांनी एकदा विचारले. पादुकांवर हात ठेवून ही शपथ घ्यावयाची होती. बहुतेकांनी 'यथाशक्य' व 'यथासंभव' यांचा वापर करून शपथा घेतल्या. पण श्रीबाबाजी महाराजच, एक काय ते निघाले की ज्यांनी कोणत्याही तऱ्हेच्या 'जर तर' चा उपयोग न करता जीवंत असेपर्यंत एक क्षण देखील मूर्ती व पादुकांना सोडून जाणार नाही, अशी शपथ घेतली. ही शपथ जन्मभर त्यांनी कशी पाळली, हे सर्व सांप्रदायिकांना माहितच आहे.

परीक्षा पाहण्याकरताच श्रीमहाराजांनी निरनिराळ्या मार्गांनी पंडितांना पैसा, प्रतिष्ठा इत्यादिकातून काय पाहिजे म्हणून विचारले होते. याकरता लागणारे साधनही त्यांनी सांगण्याचे आश्वासन दिले. पण पंडितांनी मात्र एका सद्गुरुचरणाशिवाय कशाचीहि मागणी केली नाही. नचिकेत्याला यमाने दाखविलेल्या प्रलोभनासारखाच हा प्रसंग होता.

श्रीमहाराज समाधिस्थ होण्यापूर्वी पुण्याला





बरेच दिवस आजारी होते. या आजारात अनेक प्रसंग असे येत की, ज्यावेळी आपल्या वृत्तींचा तोल सांभाळण्याची तारेवरील कसरत पंडितांना करावी लागे. काही वेळा 'माझा मंत्रच तू सोडून दे' म्हणून पंडितांकडे ते लकडा लावीत. दुसऱ्या क्षणात, 'तु आता पैशाकरता हा जप कर' असे म्हणत. क्षणाक्षणात ते कोपाविष्ट होत. सद्गुरुंच्या निष्ठेविषयीचीच ती परीक्षा होती.

देहपाताच्या वेळी अंतःकरणाला सहस्त्र वृश्चिकदंशासारख्या वेदना होत असताना सहजतेने त्यांचे वर्णन फक्त अलौकिक पुरुषच करू जाणोत. इतरांना तर त्या अवस्थेत मूर्च्छाच येते. श्रीमहाराजांच्या या वाक्याची आठवण शेवटच्या क्षणी श्रीबाबाजी महाराजांनाही झाली होती. आपल्या सद्गुरूप्रमाणेच त्यांचीही अंतःकरणवृत्ती अविचल राहिलेली सर्वांनी अनुभवलेली आहे.श्रीमहाराजांचा अवतार पंडितांकरताच असल्याचे श्रीमहाराजांनी एकदा सांगितले होते. अशा ह्या आपल्या शिष्याला आपले

सर्व आध्यात्मिक धन देऊन इ.सन ता. २०-९-१९१५ रोजी श्रीमहाराज समाधिस्थ झाले.

श्रीमहाराज समाधिस्थ झाल्यावर संप्रदायाची धुरा कोणी वहायची हा प्रश्न निर्माण झाला. श्रीमहाराजांच्या सेवेत अनेक लोक होते; पण त्यांतही श्री नानाजी कविमंडन व पंडित हे दोघेच असे होते की, ज्यांनी आपले सर्व घरदार सोडून श्रीमहाराजांच्याच चरणांचा एकमेव आश्रय घेतलेला होता. संप्रदायाच्या गादीवर येणारी व्यक्ती 'शब्दे परे च निष्णात' असावी अशी सांप्रदायिकांची इच्छा होती. सहवासात असलेल्या मंडळींना पंडितांविषयींची श्रीमहाराजांची अत्यंत आत्मीयतेची वृत्ती माहीत होती. पंडितांनी जवळ जवळ एक तप अविरत श्रीगुरूची एकनिष्ठपणे केलेली सेवाही सर्वांना माहीत होती. 'पंडितालाच मी वश झालो' असे अनेक वेळा श्रीमहाराजांच्या मुखातून निघालेले शब्दही मंडळींनी ऐकले होते.

श्री विठ्ठलराव केकरे यांचे घरी मंडल्याला





''निगमान्तपथसंदीपक'' या श्रीगुलाबराव महाराजांच्या सर्वात कठीण वेदान्त ग्रंथावर श्री पंडितांनी प्रवचन केले. श्रीमहाराजांच्या स्मरणाने प्रवचनाला सुरुवात झाली. एक ते दीड तासापर्यंत प्रवचन झाले. ऐकणाऱ्या सर्व मंडळींना श्रीमहाराजच स्वतः बोलत आहेत असे वाटू लागले. अत्यंत कठीण ग्रंथ देखील अत्यंत सोपा कसा झाला, याचे सर्वांना आश्चर्य वाटले. पंडितांना हे ज्ञान एकाएकी कसे प्राप्त झाले ह्याचाच विचार सर्वांच्या मनात घोळू लागला. श्रीमहाराजांच्या सहवासात असलेल्यांपैकी कोणीही पंडितांना अध्ययन करताना पाहिले नव्हते. सर्वकाळ श्रीमहाराजांजवळ राहून काय मिळविले अशीही शंका श्रीमहाराजांजवळ काहींनी बोलून दाखविली होती. श्रीमहाराजांनी मात्र त्यावेळी त्या शंकेचे उत्तर दिले नव्हते. पण एका प्रसंगी पंडितानेच सर्व मिळवले व ते तुम्हाला पुढे दिसेलच असे सूचकतेने सांगितले होते.

प्रवचन ऐकल्यानंतर सर्व मंडळींना श्रीगुरुकृपा केवढी प्रचंड शक्ती आहे ह्याचा बोध झाला. एकनिष्ठ





अखंड सेवेची परिणती यथार्थ ज्ञान व पराप्रीतीत कशी कशी होऊ शकते ह्याचे पंडित हे एक उदाहरण आहे असे सर्वांना वाटू लागले. काहींच्या तर डोळ्यातून आनंदाचे अश्रू आले. प्रवचन संपताच पंडितांना प्रेमाने त्यांनी मिठ्या मारल्या. समवयस्कांना तर कळेचना की आपल्याबरोबर चोवीस तास असणाऱ्या या पंडिताच्या मुखातून प्रत्यक्ष श्रीमहाराजच कसे बोलत आहेत! 'आपणासारिखे करिती तत्काळ – नाही काळवेळ तया लागी', या श्री तुकाराम महाराजांच्या उक्तीचे प्रात्यक्षिकच पंडितांच्या रूपाने सर्वांना पहावयास मिळाले. सर्वांनी माधुर्य संप्रदायाचे, आचार्य म्हणून त्यांचा स्वीकार करून साष्टांग नमस्कार केला. 'श्रीबाबाजी महाराज' म्हणून त्या दिवसापासून ते व्यवहारात ओळखले जाऊ लागले.

समाधिस्थ होण्यापूर्वी श्रीमहाराजांनी एकांतात बोलावून त्यांना काही आज्ञा लिहून घेण्यास सांगितल्या होत्या. ''त्यांनी कोणाहीकडे काहीही शिकायला न जाता घरीच सर्व ग्रंथ वाचीत जावे'' ही एक आज्ञा





होती. म्हणून अमरावतीला पहिले ५-७ वर्षे ते घरीच राहिले. अहर्निश, श्रीमहाराजांचे ग्रंथ वाचत जाणे व त्यांची टिपणे तयार करणे हा त्यांचा उद्योग राहिला. 'संप्रदायसुरतरूत' घालून दिलेल्या नियमानुसार त्यांचे वागणे असे. गोकुळ अष्टमी, श्रीकात्यायनी, शिवरात्री, रामनवमी इत्यादी वार्षिक उत्सव मोठ्या प्रमाणावर सुरू झाले. त्यांतून प्रसंगोपात्त थोडेफार प्रवचनादी कार्यक्रम ते करीत. पण मुख्यतः पहिल्या ५-७ वर्षात अध्ययनाव्यतिरिक्त इतर कोणत्याही गोष्टीकडे त्यांनी जास्त लक्ष दिले नाही.

निर्व्याज असीम प्रेम हा त्यांना जन्मजात मिळालेला वारसा होता, त्यामुळेच मधुराद्वैत संप्रदायाच्या आचार्यपदावर श्रीमहाराजांनी त्यांची स्थापना केली. त्यांच्या स्वभावात ज्ञानाचे प्राधान्य होते की प्रेमाचे हे सांगणे कठीण. त्यांच्या ग्रंथांवरून मोठमोठ्या विद्वानांशी झालेल्या वादाविवादावरूंन ज्ञानांग त्यांच्या ठिकाणी प्रकर्षाने होते हे तर निश्चितच. पण व्यवहारातील त्यांची लहान मुलापासून तो मोठमोठ्या

विद्वानांपर्यंतची वागणुक पाहिली म्हणजे ज्ञानाच्या जाणिवेचा अल्पांश त्यांच्या ठिकाणी असल्याचे दिसत नसे. सहा महिन्यांच्या चिमुकल्या मुलाला तासन् तास लाडवताना इतरांना त्यांच्या ज्ञानाविषयी संभ्रम निर्माण झाल्यास नवल ते काय? लहान मुलांबरोबर व्यावहारिक गोष्टी करण्यात दंग झालेल्या पुरुषाला सामान्य माणसाने ज्ञानी पुरुष म्हणून कसे ओळखायचे? नवीन विचारसरणीच्या तरुण मुलांशी त्यांच्या आवडत्या विषयांवर चर्चा करून हळूच आपल्या ऋषींचे म्हणणे कसे बरोबर आहे ते समजावून सांगताना त्यांच्या विद्वत्तेची ओळख त्यांना कशी व्हावी? प्रत्येकाची प्रवृत्ती व संस्कार लक्षात घेऊन त्याला न दुखवता गोड शब्दात आपली विचारसरणी ते पटवून देत. कोणी वादविवादाच्या ईर्षेनेच त्यांच्याशी वितंडा करू लागला तर मग तेही तितक्याच जोराने प्रतिवाद करीत असत; पण ते देखील वादापुरतेच. अंतःकरणात त्यामुळे दुसऱ्याविषयी कटुता त्यांनी कधीच निर्माण होऊ दिली नाही. काही वेळा तर मोठमोठ्या विद्वानांनी





त्यांच्या या वागणुकीमुळे अनपेक्षित आश्चर्याचे धक्के बसत. नागपूरातील एका मोठ्या विद्वानाशी वर्तमानपत्रातून त्यांच्यात कडाक्याचा वादविवाद चालू होता. त्याच विद्वानाच्या घरी पानसुपारीचा समारंभ होता. यात यांनाही निमंत्रित करण्यात आले. हे आपल्या मोकळ्या स्वभावाप्रमाणे तेथे पोहोचले, पण त्यांच्या ह्या अनपेक्षित आगमणामुळे त्या विद्वानास त्यांचे कोणत्या शब्दात आभार मानावेत हेच कळेना. त्यांची ही स्थिती पाहून त्या ठिकाणी उपस्थित असलेल्या दुसऱ्या एका विद्वानाने हळूच त्यांच्या कानात सांगितले की, संत व विद्वान यातील फरक हाच. विकाराला वश न होणारे तेच संत!

उत्कृष्ट परामार्थाप्रमाणेच उत्कृष्ट संसार देखील ज्ञानी पुरुषच करू शकतात, असे ते म्हणत असत त्यांचे ते म्हणणे त्यावेळी कोणाच्या लक्षात आले नाही. पण आज त्यांच्या एकंदर व्यवहाराचा विचार केला म्हणजे त्यांचे म्हणणे त्यांच्याच बाबतीत तंतोतंत लागू पडते असे म्हणावे लागते. कोणाच्याही





अंतःकरणाला स्वतःच्या वागण्याने किंवा बोलण्याने किंचितही दुःख होणार नाही याची ते सारखी काळजी घेत.तो मग लहान असो की मोठा असो. आपण असे वागलो किंवा बोललो तर त्याला काय वाटेल हा विचार नेहमी त्यांच्या डोळ्यासमोर असे. पण इतका विचार दुसरा मात्र करू शकत नव्हता. त्यामुळेच इतरांकडून त्यांना न आवडणाऱ्या अनेक गोष्टी होत. क्वचित ते गोड शब्दात कानउघाडणी करीत; क्वचित् रागानेही सांगत. पण खूप पाऊस पडल्यामुळे येणारा महापूर ओसरल्याप्रमाणे रागही थोड्याच वेळात ओसरून जात असे. आपल्या सांगण्याचा दुसऱ्यावर काहीही परिणाम होत नाही असे वाटताच मात्र पुन्हा ते त्या विषयी बोलत नसत. न आवडणाऱ्या गोष्टींविषयी देखील अत्यंत तीव्र शब्दात त्यांनी कधीच नापसंती दर्शविली नाही. फार झाले तर, हे बरोबर नाही किंवा बरे नाही इथपर्यंतच त्या नापसंतीची मर्यादा असे. धर्माज्ञापालनाशी एखाद्या गोष्टीचा संबंध असला तरी देखील कोणाला वाईट वाटेल अशा फार कडक



A



व कटु शब्दात ते आपले मत प्रदर्शित करीत नसत. फारच झाले तर त्या गोष्टींचा स्वतःशी संबंध येणार नाही, इतकी ते काळजी घेत.

धर्माच्या अविरोधी नवीन कोणतीही गोष्ट स्वीकारण्यास त्यांना हरकत नसे. केवळ जुने म्हणून ते कायम ठेवण्याकडे त्यांची प्रवृत्ती नव्हती. व्यवहारातील नवनवीन सुखसोयी त्यांना आवडत. पण त्यांचा अतिरेकी उपयोगी शेवटी हितावह नाही, असे ते म्हणत. मुलामुलींच्या राहण्यावागण्याबाबतीत देखील हाच उदार दृष्टिकोण त्यांनी स्वीकारला होता. पण भगवंताकडील ओढ ज्यामुळं कमी होईल अशी कोणतीही गोष्ट करता कामा नये इतकी काळजी मात्र घेतली पाहिजे, असे ते म्हणत.

दुसऱ्यांनी त्यांच्याकरता थोडेदेखील घेतलेले कष्ट त्यांना भारासारखें वाटत. त्यामुळे कोणत्या तरी प्रसंगाने किंवा निमित्ताने आभारपूर्वक त्याची फेड करण्याकरता ते सारखे प्रयत्नशील असत. कर्तव्याच्या पोटी देखील त्यांच्याकरता केलेले श्रम

त्यांच्या मनांत कृतज्ञताबुद्धी निर्माण करण्यास पुरेसे होत. दुसऱ्याकरिता त्यांनी केलेल्या कामाची परतफेड केलेली त्यांना आवडत नसे. पण कोणी तशी केलीच तर कृतज्ञातापूर्वक त्याचा ते स्वीकार करीत. इतरांना केलेल्या मदतीची परत फेड त्यांनी कधीच अपेक्षिली नाही. स्वतःकडून जितकी निरपेक्ष मदत होईल तितकी करावी, हे त्यांचे ध्येय होते.

त्यांच्या निर्मळ अंतःकरणामुळे इतरांना वाईट दिसणारा माणूस त्यांना नेहमी चांगलाच दिसायचा. त्यामुळे अशा त्या प्रसंगाशी त्यांचे चांगले वागणे पाहून इतरांना आश्चर्यच वाटायचे. त्याविषयी त्यांच्याकडे क्वचित कोणी बोलल्यास ते त्या प्रसंगाचा पक्षही घेण्यास कमी करीत नसत. त्यांच्या दृष्टीने सर्वच चांगले होते. 'प्रभो तुम्ही महेशाचियामूर्ती' ही त्यांची धारणा होती. जोपर्यंत त्यांना स्वतःला एखाद्या व्यक्तीचा वाईट अनुभव येत नसे तोपर्यंत ते त्याला वाईट समजायला तयार नसत. त्यामुळेच कित्येकदा व्यवहारात त्यांना अनेकांनी फसविलेही. पण त्यामुळे





त्यांनी आपल्या धारणेत बदल केला नाही.

आर्थिक व्यवहाराच्या बाबतीत ते फार चोख होते. पैशाच्या बाबतीत दिलेला शब्द पाळला पाहिजे ही त्यांची अपेक्षा होती. अडीअडचणीला शक्यतोवर केव्हाही जास्तीत जास्त आर्थिक मदद ते करीत. पण दिलेल्या शब्दाप्रमाणे जर कोणी आपला शब्द पाळला नाही तर मात्र त्यांच्या मनातून तो उतरत असे. ह्या धोरणाला त्यांनी आपला मुलगाही अपवाद मानला नाही. श्रीमहाराजांची त्यांना दिलेल्या आज्ञेप्रमाणे व 'संप्रदायसुरतरू' त घालून दिलेल्या नियमांप्रमाणे त्यांनी संसार व परमार्थ केला. आपल्या गृहस्थाश्रमाला अनुसरून कर्तव्य म्हणून समजल्या गेलेल्या सर्व कार्यांत आपल्याला मिळालेला पैसा त्यांनी खर्च केला. त्यातून सुनामुलांना पितृकर्तव्य म्हणून वाजवी जेवढे द्यावयाचे तेवढे दिले. पण त्यांच्या प्रेमाने आंधळे होऊन त्यांच्याकरता पैसा जमवण्यात त्यांनी हयात वेचली नाही. त्यांच्या स्वतःचा म्हणता येईल इतका बराच पैसा त्यांनी शेवटी संस्थानालाच दिला. सर्व आयुष्य





ज्या मधुराद्वैत संप्रदायाची उभारणी करण्यात त्यांनी वेचले त्याच संप्रदायाला त्यांनी स्वतः लिहिलेल्या पुस्तकांचेही अधिकार देऊन टाकले. संस्थान व संप्रदाय यांच्या वाढीकरता सर्व काही त्यांनी केले, पण त्यातून आपला स्वतःचा संसार त्यांनी समृद्ध केला नाही.

अंतःकरणात निर्माण होणाऱ्या विभिन्न वृत्तींच्या हालचाली त्यांच्या नजरेतून सुटत नसत. त्यामुळे बाह्य व्यवहारापेक्षा ते अंतःकरणाच्या वृत्तीला जास्त प्राधान्य देत. अत्यंत नास्तिकांशीही त्यांची मैत्री जुळू शकत होती. साम्यवादी लोकही त्यांच्याकडे चर्चा करण्याला येत. विभिन्न मतांच्या लोकांशी चर्चा करीत असताना स्वतःचे मत ते संयुक्तिक व ठामपणे प्रतिपादन करीत. पण प्रतिपक्षाचा ग्राह्यांश भाग मान्य करण्यास ते संकोचतही नसत. त्यामुळे वादविवादाचा शेवट कटुतेत न होता प्रेमातच परिणत झाल्याचे दृश्य दिसत असे. भारतीय संस्कृतीतील विभिन्न पैलूंचे उत्कृष्ट दर्शन एका आगळ्याच दृष्टिकोणातून ते घडवायचे. त्यामुळे त्याचे बोलणे ऐकणाऱ्याला स्वतःच्या मताचा





पुन्हा विचार करून ते कोठपर्यंत बरोबर आहे हे ठरवावे लागत असे. त्यांच्या विचाराचा प्रभाव त्यांच्या युक्तिवादामुळ इतरांवर सहज पडत असे. अनेक सुशिक्षित लोकांच्या विचारात त्यामुळेच परिवर्तन होऊन ते संप्रदायात ओढले गेले.

त्यांचे व्यावहारिक जीवन अत्यंत शिस्तबद्ध होते. वेळेचे बंधन पाळणे त्यांना आवडत असे. प्रवासाला गाडीवर जावयाचे असो किंवा संस्थापनाचा एखादा उत्सव करावयाचा असो, योजनाबद्ध कार्यक्रम तयार केल्याशिवाय त्यांना बरे वाटत नसे. कोणताही कार्यक्रम वेळेनुसार करण्याची त्यांची इच्छा असावयाची व त्याकरता मग त्यांच्या जिवाची धावपळ झाली तरी त्यांना चालत असे. ऐन वेळेवरची धावपळ त्यांना आवडत नसे. म्हणूनच घड्याळ हे नेहमी त्यांच्या बरोबर असायचेच. इतरांची सोय पहाणे हा तर त्यांचा स्वभावच होता. कात्यायनी, गोकुळ अष्टमी किंवा महाशिवरात्री या उत्सवांना येणाऱ्या लोकांना येताना व परत जाताना काही त्रास होणार नाही या बेताने सर्व कार्यक्रमाची आखणी ते करीत. एखाद्याला

(२५)

गुरुवारीच रात्रीच्या गाडीने निघायचे असले तर त्याच्याकरता पालखीचा कार्यक्रम देखील नेहमीच्या वेळेत कमी जास्त बदल करून करायला सांगत. ‘सर्वेषामविरोधेन ब्रह्मकर्म समारभेत’ ही तत्त्वज्ञानाची शिकवण ‘ब्रह्मरूपाची ती कर्मे ब्रह्मरूप’ असणाऱ्या त्यांच्या सारख्या ज्ञान्यांच्याच हातून व्हावीत हेच खरे. दुसऱ्यांच्या सोयीकरता, संस्थानात असो किंवा दुसऱ्याच्या घरी असो, आपल्या नित्य चर्चेच्या वेळात फेरफार करण्याची त्यांची वृत्ती पाहिली म्हणजे त्यांच्या लोकसंग्रही वृत्तीपुढे नतमस्तक व्हावेसे वाटते.

नेटका संसार करणाराच नेटका परमार्थ करू शकतो, ही गोष्ट खरी आहे. त्यांची स्वतःची रहाणी अत्यंत स्वच्छ व टापटीपीची. धोतर व कपडे अत्यंत स्वच्छ असल्याशिवाय त्यांचा ते वापर करण्यास तयार नसत. परवडेल तेवढेच माफक कपडे असावे, पण ते पुर्ण स्वच्छ मात्र असले पाहिजेत असे ते म्हणत. स्वच्छता व शुचिर्भूतता यांचा त्यामुळेच त्यांच्या ठिकाणी अपूर्व संगम झाला होता. शौचादी विधी झाल्यावर



(२६)

शास्त्रानुसार मातीपाण्याने अनेक वेळा शरीर शुद्धी झाल्याशिवाय ते कोठेही शिवणार नाहीत. हा क्रम शेवटच्या श्वासोच्छवासापर्यंत ते कायम ठेवू शकले. शास्त्रपूत आचरणावर त्यामुळेच त्यांचा भर होता. आपण कडक सोवळे पाळतो असे म्हणणाऱ्या लोकांपेक्षाही त्यांचे सोवळे कडक असूनही इतरांना ते जाचक होत नव्हते, हा त्यांच्या आचरणाचा विशेष भाग होता. ते स्वतः शास्त्रविहित विधींचे पालन करीत. पण इतर तसे करीत नाहीत म्हणून इतरांविषयी तिरस्कार किंवा तुच्छता त्यांनी चुकून देखील दर्शविली नाही.

स्वच्छता, टापटीप, वक्तशीरपणा व योजनाबद्धता हे लहानपणापासून त्यांच्या अंगात भिनलेले गुण होते. त्यामुळेच अनेक लेख व ग्रन्थ त्यांच्या लेखणीतून उतरू शकले. ग्रंथलेखनाचा देखील योजनाबद्ध कार्यक्रम त्यांनी आखला होता. सर्व ग्रंथांची जी टिपणे त्यांनी काढून ठेवलेली आहेत ती पाहिल्यावर तर जणू काय ती छापलेलीच आहेत असा पहाणाऱ्यांना




(२७)

भ्रम होतो. ह्रस्व, दीर्घ व अनुस्वार इत्यादी शुद्धलेखनाच्या नियमांचे काटेकोर पालन त्यांच्या लिखाणातून असायचे. पहिल्या लिखाणात बरेच फेरफार झाल्यास मुद्रकाला वाचताना अडचण होईल म्हणून पुन्हा सर्व मजकूर एकटाकी सुवाच्य असायची. त्यामुळे मुद्रिते तपासताना कोणालाच त्रास होत नसे.

या गुणांचा परिणाम त्यांच्या एकंदर जीवनपद्धतीवर झालेला होता. योजनाबद्धतेमुळे कोणताही कार्यक्रम व्यवस्थित होऊन पैशाचा अपव्यय होणार नाही याकडे त्यांचे बारीक लक्ष असे. खाण्यापिण्यात कोणत्याही तऱ्हेची कमतरता ते करीत नसत, पण त्याबरोबरच फाजील खर्च होईल अशी कोणतीही गोष्ट करू देत नसत, बडेजाव व मोठेपणाची जाणीव यांचा त्यांना मनापासून तिटकारा असे. पण अनुकूलता असूनही खर्च न करण्याची प्रवृत्ती [illegible] नतदृष्टतेचे लक्षण वाटत असे. भगवंताला [illegible] करून सर्व भोग भोगावे असे ते म्हणत [illegible] भगवंताला आपापल्या ऐपतीप्रमाणे सर्व [illegible]

**गुरुसंप्रदायधर्म ।**
**हेचि जयाचे वर्णाश्रम ।**
**गुरुपरिचर्या नित्यकर्म । जयाचे या ॥**





(२८)

करायला पाहिजे अशी त्यांची शिकवण होती. धर्मानुरूप अर्थ व काम प्राप्त करून भगवंताचे प्रेम ज्यामुळे अंतःकरणात निर्माण व स्थिर होईल असे करीत राहण्यात जीवनाचे साफल्य आहे व ही गोष्ट केवल ‘संप्रदाये उपासलिया’ प्राप्त होते असे श्रीमाऊलीचे म्हणणे आहे. म्हणून सांप्रदायिकांना संप्रदायनुरूप आपले आचरण ठेवावे असा त्यांचा उपदेश होता.

तर्क व श्रद्धा यात श्रद्धेला त्यांच्या दृष्टीने जास्त महत्व होते. असीम एकनिष्ठ श्रद्धेची प्राप्ती होणे ह्यातच जीवनाचे साफल्य ते मानीत. श्रीमहाराज व श्रीमाऊली ह्यांचे गुणानुवाद व अखंड नामस्मरण करणे हेच साधन व साध्य असून सांप्रदायिकांनी आपल्या डोळ्यांसमोर तेच ध्येय ठेवावे आणि श्रीमहाराजांच्या ग्रंथांचे सारखे वाचन निष्ठा दृढ करण्यात परिणत होत असल्याकारणाने सांप्रदायिकांनी त्यांचे सारखे वाचन ठेवावे व तदनुसार आपला आचार शक्यतोवर करण्याचा प्रयत्न करावा, असे ते म्हणत. यातच त्यांचे कल्याण ते मानीत. भगवंताकडे चित्त



**सर्व धर्मसमन**
**सूत्र**

एकाधिकार
भिन्नवृत्तित्वे
संप्रदाय-विच
रहितत्वे सति
पूर्वानिक-फलोप
अनन्तरम्
एकफलजनक
समन्वयलक्षण
जगातील सर्व
अधिष्ठान एव
सत्ववृद्धी
पण अधिकार

जेवढे आकृष्ट होईल तेवढा तो धर्म किंवा पुण्य व भगवंताकडून निघून दुसरीकडे जितके जास्त चित्त ओढले जाईल तितका तो अधर्म किंवा पाप, अशी पापपुण्याची किंवा धर्माधर्माची सोपी व्याख्या ते सांगत. भगवंताला समर्पण करता येऊ शकेल ते भक्ष्य व भगवंताला जे समर्पण करता येऊ शकणार नाही, ते अभक्ष्य समजावे. थोडक्यात म्हणजे भगवंत हा जीवनाचा केंद्र बिंदु डोळ्यासमोर ठेऊन सर्व व्यवहाराचा व परमार्थाचा विचार करावा ही त्यांची शिकवण होती. धर्मानिष्ट आचारधर्माचे प्राप्त परिस्थिती पूर्ण पालन होत नाही, म्हणून ते चूक न म्हणता परिस्थितिवश झाल्यामुळे आपल्या अधर्माचरणाबद्दल भगवंताची क्षमायाचना करावी हाच त्यातून मुक्त होण्याचा मार्ग आहे, असे ते म्हणत. व्यवहारात एवढे सारखे अनुसंधान ठेवल्यास परमार्थाची वाटचाल प्रगतिपर निश्चितच होऊ शकते सद्गद् प्रेमळ अंतःकरणाची परमेश्वराला अपेक्षा आहे व अशा अंतःकरणाची भूमि तयार करण्यास संतांच्या





वाङ्मयासारखे दुसरे वाङ्मय नाही. म्हणून त्याचेच वाचन, मनन व निदिध्यासन करणे आवश्यक असल्याचे ते सांगत.

नागपुरातील मंडळींच्या आग्रहावरून अमरावतीहून नागपूरला त्यांनी आपला मुक्काम हलविला. श्री. चांदे यांनी आपल्या घरीच रहावे अशी इच्छा प्रदर्शित केल्यामुळे ते त्यांच्या घरी राहू लागले. नागपूरला आल्यावर त्यांनी संप्रदायाला व्यवस्थित रूप देण्याला सुरूवात केली. निरनिराळ्या उत्सवांच्या निमित्ताने अनेक अपरिचित लोक त्यांच्या सहवासात येऊ लागले. प्रवचनांतून श्रीमहाराजांच्या वाङ्मयाचे दर्शन ते लोकांना घडवू लागले. त्यामुळे अनेक सुशिक्षित लोक संप्रदायाकडे आकर्षित होऊ लागले. १९२४ च्या सुमारास त्यांनी 'आर्यधर्मोपपत्ति' हा आपला ग्रंथ प्रसिद्ध केला. ह्या ग्रंथातील युक्तिवाद निआर्य व अनार्य यासंबंधीची नवीन विचारसरणी वाचून लोकांना त्या पुस्तकाविषयी बरीच जिज्ञासा निर्माण झाली. तपस्वी बाबासाहेब परांजपे, किंजवडेकर शास्त्री,





बाबाराव सावरकर इत्यादी देशभक्तही त्यांच्याकडे येऊ लागले. तत्त्वज्ञ व विचारवंत लेखक म्हणून मराठी जनतेला या पुस्तकामुळे त्यांचा परिचय झाला.

अध्ययनाला अध्यापनाची जोड असल्यास ज्ञान दृढ होण्याला मदतच होते. नागपूरचे प्रो. माधवराव दाणी व उमरेडचे कै. आबाजी पेंडके वकील हे अलाहाबाद विद्यापीठाच्या एम.ए. परीक्षेला बसणार होते. त्यांनी एम.ए. संस्कृतकरता अद्वैत वेदान्तभाग निवडला होता. या विभागाच्या पाठ्यक्रमात खंडखंडाचा काही भाग, संक्षेप शारीरिक विवरणाप्रमेयसंग्रह, ब्रह्मसूत्रभाष्य इत्यादी ग्रंथ अंतर्भूत करण्यात आले होते. हे सर्व ग्रंथ पांडित्यपूर्ण असल्यामुळे कोणीतरी शिकविल्याशिवाय स्वतः घरी अभ्यास येणे कठीण होते. नागपुरातील त्यावेळी ख्यातनम असलेल्या विद्वानांकडे विचारणा केली, पण कोणीहि हे ग्रंथ शिकवण्यास तयार होईना. शेवटी ते यांच्याकडे आले. यांनी शिकवण्याचे मोठ्या आनंदाने मान्य केले.

संप्रदाय चालविण्याच्या दृष्टीने भजनाचे अंग





आत्मसात करणे आवश्यक होते. गायनाची आवड होती, पण शास्त्रशुद्ध गायन येत नव्हते. भजन कसेही करावे अशी त्यांची वृत्ती नव्हती. भजनच करावयाचे तर ते चांगले सुस्वर करता आले पाहिजे, असे ते म्हणत. म्हणूनच त्यांनी अमरावतीला आल्यानंतर त्या काळातील प्रख्यात असलेल्या नामदेवबुवांच्या गायनशाळेत आपले नाव घातले. कै. नथ्थुबोवा हे त्यांचे गुरुबंधू होते. नथ्थूबोवा नागपूरला आले म्हणजे जुने नाते कायम ठेवून घरी गायनाचा एखादा कार्यक्रम करून जात. जवळ जवळ सहासात वर्षे ते शास्त्रीय गायन शिकले. संगीतावरील सर्व ग्रंथ त्यांनी अभ्यासिले होते. सुस्वर भजन करता यावे म्हणून पहाटे उठून चार चार तास रागदारीतील अभंगांचा ते रियाज करीत. निरनिराळ्या रागांतून अनेक अभंग त्यांनी स्वतः बसविले होते. भजन
...चाच नवीन अ
...त असत. गार
...ायकीकडे मग





नाही. अत्यंत चिकाटी हा त्यांच्या स्वभावाचा एक विशेष पैलू होता. त्यामुळे हाती घेतलेल्या कोणत्याही गोष्टीत प्रावीण्य मिळेपर्यंत ते ती सोडत नसत.

जी गोष्ट गायनाची तीच आयुर्वेद शास्त्राची. श्री महाराजांच्या सहवासात त्यांनी अनेकदा आयुर्वेदाविषयी चर्चा ऐकली होती. महाराजांच्या बरोबर असताना आयुर्वेदावरील अनेक ग्रंथ त्यांनी वाचले होते. पण शास्त्रीय अध्ययन म्हणून ज्याला म्हणता येईल असे त्यांनी कोठेच केलेले नव्हते. अमरावतीला आल्यानंतर आयुर्वेदाचे देखील शास्त्रीय अध्ययन त्यांनी स्वतः घरीच करायला सुरुवात केली. जवळ जवळ ६-७ वर्षे त्यातही त्यांनी घालविली. नागपूरला आल्यानंतर तर बऱ्याच विद्यार्थ्यांना वाग्भट, माधवनिदान इत्यादी ग्रंथ स्वतः शिकवले. केवळ अध्ययन व अध्यापन करूनच ते थांबले नाहीत, तर आयुर्वेदातील औषधे स्वतःच्या देखरेखीखाली त्यांनी घरी तयार करविली. जे रोगी त्यांच्याकडे येत त्यांना तपासून औषध देत. संप्रदायाचा असो की





बाहेरचा असो, सर्वांना औषधी मोफत देत. निदान चांगले असल्यामुळे अनेक लोकांना गुण येई. ह्यामुळे कित्येकदा चांगले चांगले डॉटरही त्यांच्याकडून औषधी घेत. आयुर्वेदाच्या ज्ञानाचा उपयोग केवळ लोककल्याणाकरताच करण्याची श्रीमहाराजांची आज्ञा असल्यामुळे त्यांनी पैसा कमावण्याकरता त्या ज्ञानाचा कधीच उपयोग केला नाही. गुण येऊन श्रीमंतांनी दिल्यास त्याचा उपयोग नवीन औषधे तयार करण्यात ते करीत. आयुर्वेदाच्या क्षेत्रात त्यांनी पुढे इतकी मान्यता मिळविली की, मध्यप्रदेश आयुर्वेद मंडळाचे सदस्यच नव्हते तर कित्येक वर्षे अध्यक्ष देखील ते राहिले. आयुर्वेदाच्या उन्नतीकरता डॉक्टर लोकांनीच पुढाकार घेतला पाहिजे, असे ते म्हणत.

रोग्यांची शुश्रूषा हा तर त्यांचा एक आवडता छंदच होता. नातेवाईक असो की सांप्रदायिक असो, कोणीही आजारी झाला म्हणजे रोग्यापेक्षाही त्यांच्याच मनाला जास्त वेदना होत असत. रोगी घरचा असो की बाहेरचा असो, त्याला औषधाने बरे वाटत आहे





की नाही याची सारखी काळजी त्यांना असे. रोग्याशी त्यांची वागणूक एखाद्या आईसारखी असे. मुलाला जितक्या हळुवारपणे हाताळावे तितक्या हळुवारपणे ते रोग्याला हाताळत. रोग्याची शुश्रूषा करण्यात ते दिवसाची रात्र व रात्रीचा दिवस करीत. त्यामुळे आपली प्रकृती बिघडेल इकडेही ते कधी लक्ष देत नसत. औषध पथ्यपाण्यापासून स्वतः जातीने राग्याकडे ते लक्ष देत. शौचादी विधीपासून पोटिसे लावण्यापर्यंतची रोग्याची सर्व कामे ते स्वतःच करीत. संप्रदायाच्या मंडळीविषयी तर नातेवाईकांपेक्षाही जास्त काळजी त्यांना असे. अनेकांना त्यांनी घरी ठेऊन महीनोगणती त्यांची स्वतः सर्व शुश्रूषा केलेली आहे. पण इतके कष्ट करूनही त्यांच्या मुखावरचे हास्य कधीहि मावळलेले कोणी पाहिले नाही. अत्यंत कष्टसाध्य आजारातून त्यांच्या शुश्रूषेमुळे अनेकांना जीवनदान मिळालेले आहे. आजही ते लोक हयात आहेत. 'शिष्यांची जो नेघे सेवा । मानी देवासमान' ही तुकाराम महाराजांची उक्ती त्यांच्या वागण्याला सार्थ झालेली





दिसत असे.

स्वतः आजारी झाले असता मात्र अगदी वेगळे दृश्य दिसायचे. कोणालाही आपल्या दुखण्यामुळे कोणताही त्रास होऊ नये म्हणून दुखणे मोठे असले तरी ते क्षुल्लक असल्याचे व काळजी करण्यासारखे नसल्याचे दाखवत असत. अशक्ततेमूळे बोलणे होत नसले तरी दुसऱ्याचा विरस होऊ नये म्हणून हसून दोन गोड शब्द बोलायचे. आलेल्यांची त्याही स्थितीत सर्व चौकशी करायची. तब्येतीविषयी विचारायचे, मुलाबाळांविषयी विचारायचे. त्याने आपले काही दुःख सांगितले म्हणजे त्याही स्थितीत धीर देऊन सर्व उत्तम होईल, काळजी करू नकोस, असे म्हणायचे. हे गोड शब्द ऐकून त्यालाही आपल्या दुःखचा विसर पडायचा व तो आनंदी होऊन परत जायचा. स्वतःला होणारा त्रास मात्र मुळीच दिसू द्यायचे नाहीत. तोंडावरचे हास्य तसेच ठेवायचे. संतांचे सर्वच अलौकिक असते म्हणतात ते काही खोटे नाही.

एकंदर पाऊणशे वर्षांच्या आयुष्यातील

पहिली काही वर्षे सोडल्यास आपले सर्व आयुष्य त्यांनी स्वतः प्रतिपादन केलेल्या तत्त्वज्ञानानुसार व विचारसरणीप्रमाणे घालविले. त्यात व्यवहार व परमार्थ यांच्यात विरोध न येता ते दोन्हीही परमार्थरूपच झालेत. आयुष्याच्या क्षणाक्षणाचा हिशेब मनात ठेवून सत्कारणी लावण्याचा प्रयत्न त्यांनी केला. शरीर पूर्ण थकल्यावर हळू हळू सर्व चित्तवृत्ती श्रीमहाराजांच्या चरणी केंद्रित केल्या वा तोंडावरचे हास्य कायम ठेवून दिनांक १-२-६४ शनिवार रोजी दुपारी १-३० वाजता 'नमःशिवाय' म्हणून आपल्या समर्पित जीवनाची सांगता केली.

मधुराद्वैत संप्रदायप्रवर्तक श्रीगुलाबरावमहाराजांचे एकमेव अधिकृत भाष्यकार म्हणून त्यांचे नांव श्री गुलाबराव महाराजांबरोबरच मुमुक्षुंच्या स्मरणाच राहील. श्रीमाऊलीच्या तत्त्वज्ञानाचे 'शाब्दे परे च' निष्णात भाष्यकार म्हणून ही गुरुशिष्यांची जोडी नाथसंप्रदायाला नित्यच ललामभूत राहिल. आर्यधर्मोपपत्ति, हरिपाठरहस्य, अमृतानुभव





कौमुदी, श्रीज्ञानेश्वरी गूढार्थदिपीका (१७ अध्यायापर्यंत), विविध लेखसंग्रह, अभंगगाथा या सर्व वाङ्मयाच्या रूपाने महाराष्ट्र सारस्वतात ते अमर राहतील. तत्त्वजिज्ञासू पुरुषांच्या जीवनाचे तारू योग्य दिशेला नेण्यास हे अमर वाङ्मय सदैव मार्गदर्शन करीत राहील. यात संशय नाही. प्रश्न फक्त मार्गदर्शनाची अपेक्षा करणाऱ्या व्यक्तींचाच आहे. अशा तऱ्हेची गोडी असणारा वाचकवर्गही विरळाच झालेला आहे. 'बहुता सुकृताची जोडी' असल्याशिवाय या वाङ्मयाकडे लक्ष तरी कसे लागावे? त्याकरताही भगवद्कृपेचीच आवश्यकता आहे. भगवंतानी एवढी तरी आमच्यावर कृपा करावी, अशी प्रार्थना करू या !

स्कंददाससुत